(सारांश- Synopsis)

असंघटित क्षेत्रातील बांधकाम कामगारांचे समाजशास्त्रीय अध्ययन : विशेष संदर्भ-लातूर जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत मानव्यविद्या

शाखे अंतर्गत समाजशास्त्र विषयात पीएच्.डी.(Ph.D.) प्राप्त

करण्यासाठी प्रस्तुत

शोध प्रबंधाचा आराखडा

- : संशोधक :-

नागनाथ अंकुश पांचाळ

लातूर

- : मार्गदर्शक :-

प्रा. डॉ. ए. टी. शिंदे

प्रमुख, समाजशास्त्र विभाग

इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको, नांदेड

जून - २०१९

असंघटित क्षेत्रातील बांधकाम कामगारांचे समाजशास्त्रीय अध्ययन : विशेष संदर्भ-लातूर जिल्हा

१.प्रस्तावना :

भारताला स्वांतत्र्य मिळाल्यानंतर सुरुवातीची काही दशके भारतीय अर्थव्यवस्था कृषीक्षेत्रावर आधारित होती. स्वातंत्र्यानंतर भारतातील विकास धोरण पंचवार्षिक योजनांच्या उद्दिष्टानुसार घडून आले. पहिल्या आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये कृषीक्षेत्राबरोबरच औद्योगिक क्षेत्राच्या विकासावर लक्ष केंद्रीत करण्यात आले. परिणामी भारतातील औद्योगिकीकरणाची प्रक्रिया खऱ्या अर्थाने स्वातंत्र्योत्तर कालखंडात सुरु झाली. औद्योगिकीकरणानंतर रोजगार निर्मितीची नवनवीन क्षेत्र निर्माण झाली. औद्योगिक शहरे रोजगार निर्मितीचे केंद्र बनल्यामुळे ग्रामीण भागाकडून शहराकडे होणारे स्थलांतर वाढीस लागले. या स्थंलातरामुळे निवास विषयक प्रश्न निर्माण झाले यामुळेच शहरामध्ये निवासी बांधकाम क्षेत्र वाढीस लागले व त्यामुळे शहरामध्ये निवासी बांधकाम क्षेत्र हे रोजगार मिळण्याचे एक प्रमुख केंद्र बनले त्यामध्ये ग्रामीण भागातून आलेल्या अशिक्षित, अल्पभूधारक, भूमिहिन, कष्टकरी व इतर प्रदेशातून आलेल्या स्थलांतरीत कामगारांचा समावेश होतो.

भारतातील शहरीकरणाचे प्रमाण २०१३ मध्ये ३१.१ इतके होते. महाराष्ट्रामध्ये मात्र शहरीकरणाची प्रक्रिया मोठ्याप्रमाणात होताना दिसून येते. २०१२-१३ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्राचे शहरीकरणाचे प्रमाण ४५.२ टक्के एवढे होते, म्हणजेच महाराष्ट्रातील जवळपास निम्मी लोकसंख्या शहरामध्ये वास्तव करत आहे.

१९९१ साली भारताने जागतिकीकरण ही संकल्पना स्विकारली त्यावेळी संरचनात्मक समायोजन कार्यक्रम (Structural Adjustment Programme) राबवून जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरण या तीन संकल्पनाचा स्वीकार करुन भारताने नवीन आर्थिक धोरण आखले. त्यामुळे उद्योगाचे व इतर व्यवसायाचे खाजगीकरण मोठ्याप्रमाणात घडून आले. जागतिकीकरणानंतर भारताने

आखलेल्या नवीन आर्थिक धोरणानुसार शासनाला सार्वजनिक उद्योगातील गुंतवणूक कमी करावी लागली. परिणामी काही कारखाने विकले गेले. गेल्या काही वर्षात १५० सार्वजनिक कारखान्यातील एक लाखाहून अधिक कामगार कमी केले असून ४ ते ५ लाख कामगारांवर आपला रोजगार गमवण्याची वेळ येण्याची शक्यता आहे. (पंडित नलिनी, २००४) त्यामुळे जागतिकीकरणानंतर असंघटित क्षेत्र वाढीस लागलेले दिसून येते.

महाराष्ट्रातील असंघटित क्षेत्रातील कामगार (१९९१)

असंघटित क्षेत्र	**असंघटित क्षेत्रातील कामगारांची टक्केवारी**	**असंघटित क्षेत्रातील कामगारांची संख्या (लाखात)**
शेतकरी	३२.८१	१०१.७१
शेतमजूर	२६.८१	८३११
उद्योग	११.६०	३५.१९
दळणवळण व इतर	१०.३८	३२.१७
वाहतूक	३.७१	११.५९
वस्तुनिर्माण-घरगुती	१.६१	४.६८
बागकाम	०.३७	१०१४
एकूण	**१००**	**३.१० कोटी**

स्त्रोत - खातू गजानन, २००४

सदर आकडेवारी प्रमाणे असंघटित क्षेत्रात सर्वात अधिक कामगार शेती क्षेत्रात गुंतलेले आहे. त्याचबरोबर बांधकाम क्षेत्रात २६.५६ लाख कामगार काम करत असलेले दिसून येतात.

असंघटित क्षेत्रात जवळपास ४६ कोटी कामगार काम करत असून त्यामध्ये १४ कोटी महिलांचा समावेश आहे.(Chatterjee Subhasish,२०१६). आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने १९९८-९९ साली जागतिक रोजगारीबद्दल जो अहवाल प्रसिद्ध केला (World Employment Report १९९८) त्यानुसार जगातील ३०० कोटी

कामगार बेकार होते आणि ७५ ते ९० कोटी कामगार अर्धवेळ काम करणारे होते. (पंडित नलिनी, २००४). भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये मोठ्याप्रमाणात असंघटित क्षेत्राचे प्राबल्य दिसून येते. २०१२ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात मुख्यत: ३.१० कोटी कामगार असंघटित क्षेत्रात काम करत असलेले दिसून येतात.

२. संशोधन विषयाची निवड :

औद्योगीकरण व शहरीकरणामुळे खुप मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातून शहराकडे लोक रोजगारासाठी येत आहेत. त्यामध्ये शहरात निवासी बांधकाम क्षेत्र एक रोजगार निर्मितीचे केंद्रच बनले आहे. त्यामुळे बांधकाम क्षेत्रातील कामगार व ठेकेदार मालक, बिल्डर यांच्यातील संबंधी कामाचे स्वरुप व त्यांना मिळणारी मजुरी, बांधकाम कामगाराची सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक परिस्थिती, सुरक्षिततेची गंभीर समस्या व इतर देखील बांधकाम कामगारासंबंधीचे प्रश्न जाणून घेण्यासाठी 'असंघटित क्षेत्रातील बांधकाम कामगारांचे समाजशास्त्रीय अध्ययन: विशेष संदर्भ-लातूर जिल्हा' हा संशोधन विषय निवडला आहे.

३. संशोधन विषयाचे महत्त्व :

'असंघटित क्षेत्रातील बांधकाम कामगारांचे समाजशास्त्रीय अध्ययन: विशेष संदर्भ-लातूर जिल्हा' हा संशोधन विषय बांधकाम क्षेत्रातील कामगारांचे ठेकेदार, मालक, बिल्डर यांच्याकडून होणारे शोषण त्यांची सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक पार्श्वभूमी, त्यांना त्यांचा कामाचा योग्य मोबदला मिळतो का? कामाच्या ठिकाणी सुरक्षितता साधने देण्यात येतात का? असे अनेक नवनवीन प्रश्नांची माहिती समजून घेण्यासाठी हा संशोधन विषय महत्त्वपूर्ण ठरेल.

४. संशोधनाची उद्दिष्टये :

१. बांधकाम क्षेत्रातील कामगाराचे स्वरुप जाणून घेणे.
२. बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक पार्श्वभूमीचे अध्ययन करणे.
३. बांधकाम क्षेत्रातील कामगाराच्या मुलांचे शैक्षणिक जीवनमान समजून घेणे.

४. बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या कामाचे स्वरुप मुजरी इत्यादी विषयक बाबीचा आढावा घेणे.

५. बांधकाम क्षेत्रातील काम करणाऱ्या कामगाराची सामाजिक सुरक्षितता समजून घेणे.

५. संशोधन विषयाची गृहितके :

१. शहरीकरणामुळे बांधकाम क्षेत्रात कामगाराचे प्रमाण वाढत आहे.

२. बांधकाम क्षेत्रातील कामगाराची सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थिती निम्म दर्जाची आहे.

३. बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगाराची मुले शिक्षणापासून वंचित राहतात.

४. बांधकाम क्षेत्रातील कामगारांना त्यांच्या कामाच्या मोबदल्यात योग्य मजुरी मिळत नाही.

५. बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना सामाजिक सुरक्षिततेचा अभाव आहे.

६.संशोधन पध्दती / पध्दतीशास्त्र :

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी पुढील संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

६.१ संशोधन क्षेत्र आणि कालखंड :

'असंघटित क्षेत्रातील बांधकाम कामगारांच समाजशास्त्रीय अध्ययन : विशेष संदर्भ-लातूर जिल्हा' या संशोधन विषयासाठी संशोधन क्षेत्र म्हणून महाराष्ट्रातील एक विकसीत जिल्हा म्हणून ओळखला जाणाऱ्या लातूर जिल्हयाचा समावेश केला आहे. कालखंडाच्या बाबतीत यामध्ये मागील दहा वर्षाचा कालखंड निश्चित केला आहे. यामध्ये सन २००९-२०१९ हा घेतला आहे.

६.२ सामाजिक वर्जितता :

प्रस्तुत संशोधनासाठी सामाजिक वर्जितता या दृष्टिकोनाचा वापर करण्यात येणार आहे. सामाजिक वर्जितता ही एक गतिशील आणि बहुआयामी संकल्पना

मानली जाते. सामाजिक वर्जितता ही संकल्पना प्रामुख्याने वैयक्तिक व सामूहिक अशा दोन्ही संदर्भाकरिता उद्देशून वापरली जाते. व्यक्ती किंवा समूह यांच्या सामाजिक आर्थिक व राजकीय जीवनातील सहभागामध्ये अडचणी निर्माण होतात व परिणामी असे व्यक्ती व समूह समाजाच्या सर्व परिक्षेत्रातून बाहेर फेकले जातात. व्यक्ती व समाज यांच्यातील संबंध तुटणे याला सामाजिक वर्जितता म्हणून संबोधले जाते.

६.३ संशोधनाच्या मर्यादा :

प्रस्तुत संशोधनासंबंधी माहिती प्राप्त करताना पुढील मर्यादा येऊ शकतात.

१. बांधकाम क्षेत्रातील कामगार ठेकेदार व मालक यांच्या दबावामुळे खरी माहिती सांगतीलच असे नाही.
२. बांधकाम क्षेत्रातील कामगारांनी सांगितलेली आकडेवारी योग्य असेलच असे नाही.
३. प्रस्तुत संशोधन फक्त लातूर जिल्हयापुरतेच मर्यादित राहिल.
४. सदर संशोधनात केवळ सन २००९-२०१९ पर्यंतच्या कालखंडातील अभ्यासापुरते मर्यादित असेल.

६.४ संशोधन आराखडा :

प्रस्तुत संशोधन विषयासाठी विश्लेषणात्मक व अन्वेषणात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे.

६.५ नमुना निवड पध्दती :

'असंघटित क्षेत्रातील बांधकाम कामगारांचे समाजशास्त्रीय अध्ययन : विशेष संदर्भ-लातूर जिल्हा' या संशोधनासाठी सोयीस्कर नमुना निवड व सहेतुक किंवा उद्देशपूर्ण नमुना निवड पध्दतीद्वारे नमुना निवड केली जाणार आहे. लातूर जिल्ह्यात १० तालुक्यांच्या समावेश होतो. त्यामुळे प्रत्येक तालूक्यातून २० नमून्याची नमुना निवड करुन एकूण २०० नमुन्याची निवड करुन त्यांच्याद्वारे तथ्य संकलन केले जाणार आहे.

६.६ तथ्य संकलन पध्दती :

सामाजिक संशोधनामध्ये तथ्य संकलनास अतिशय महत्त्वाचे स्थान असते. प्रस्तुत संशोधनाचा अध्ययन करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम या दोन्ही तथ्य संकलन तंत्रांचा उपयोग करण्यात येणार आहे. प्राथमिक तथ्य संकलनासाठी निरीक्षण व मुलाखत अनुसूची या दोन स्त्रोताचा उपयोग करण्यात येणार आहे. तसेच दुय्यम स्त्रोतांमध्ये प्रकाशित व अप्रकाशित लेख, संदर्भग्रंथ, शोधप्रबंध शासकीय अहवाल, मासिक, वर्तमानपत्रे, इत्यादीचा वापर करुन तथ्य संकलन करण्यात येणार आहे.

६.७ तथ्याचे विश्लेषण आणि वर्गीकरण :

प्रस्तुत संशोधनामध्ये प्राथमिक व दुय्यम स्त्रोताद्वारे प्राप्त केलेल्या तथ्यांचे विश्लेषण आणि वर्गीकरण करण्यासाठी सारणीकरण, स्तंभलेख व आलेख याचा वापर करण्यात येणार आहे. याद्वारे निष्कर्षाची मांडणी केली जाणार आहे.

६.८ अहवाल लेखन :

'असंघटित क्षेत्रातील बांधकाम कामगारांचे समाजशास्त्रीय अध्ययन : विशेष संदर्भ-लातूर जिल्हा' या संशोधन विषयाचे पूढील पाच प्रकरणांमध्ये अहवाल लेखन करण्यात येणार आहे.

प्रकरण -१ प्रस्तावना

प्रकरण- २ साहित्याचे पुनरावलोकन

प्रकरण- ३ संशोधन पध्दती / पध्दतीशास्त्र

प्रकरण- ४ तथ्याचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

प्रकरण- ५ निष्कर्ष आणि शिफारशी

७. संदर्भ ग्रंथ :

१. पंडित नलिनी (२००४), जागतिकीकरण आणि भारत अक्षर प्रकाशन, मुंबई.

२. तांबे श्रुती (२०१६), वेध शहरांचा : सामाजिक अवकाश, कल्पिते आणि धोरणे, डायमंड प्रकाशन, पुणे.

३. गर्गे सं,(१९९१), समाजविज्ञान कोश, कल्पना मुद्रणालय, मुंबई

४. खैरनार दिलीप, (२०११), प्रगत सामाजिक संशोधन पध्दती व सांख्यिकी, डायमंड प्रकाशन, पुणे.

५. सोमण मा. (२००९), सामाजिक संशोधनाची तंत्रे, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे.

६. तांबे श्रुती, (२०१५), भारतीय शहर : विखंडीत वास्तवाची जगे, भारत वार्षिकी.

७. खातू, गजानन, (२००४), जागतिकीकरणाच दाहक वास्तव, अक्षर प्रकाशन, मुंबई.

८. Chatterjee, S. (२०१६), Labours of Unorganised sectors and their problems, International Journal of Emerging Trends in Science and Technology, ३ (७).

संशोधक

नागनाथ अंकुश पांचाळ

मार्गदर्शक

प्रा. डॉ. ए. टी. शिंदे

प्रमुख, समाजशास्त्र विभाग

इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय,

सिडको, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत मानव्य विद्या शाखे अंतर्गत समाजशास्त्र विषयात पीएच्.डी.(Ph.D.) प्राप्त करण्यासाठी प्रस्तुत शोध प्रबंधाचा आराखडा

असंघटित क्षेत्रातील बांधकाम कामगारांचे समाजशास्त्रीय अध्ययन : विशेष संदर्भ-लातूर जिल्हा

संशोधकाचे नाव :- ***नागनाथ अंकुश पाचांळ***

विषय : *समाजशास्त्र*

मो. नं.: 8208502932

प्रवर्ग : *OBC (सुतार)*

पत्ता : *मु. पो. सेलू, ता. औसा, जि. लातूर.*

ई-मेल : *panchalnagnath२०१७*@gmail.com

मार्गदर्शकाचे नाव : ***प्रा. डॉ. ए. टी. शिंदे***

महाविद्यालयाचे नाव : प्रमुख समाजशास्त्र विभाग
इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको, नांदेड

मो. न. : 9922653020

ई-मेल : shindeatsoc@gmail.com